"लातूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरीकांच्या मानवाधिकारांचे समाजशास्त्रीय अध्ययन"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्याशाखे अंतर्गत 'समाजशास्त्र' विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणारा शोधप्रबंधचा आराखडा

~: संशोधक :~

बोकडे भगवंत चंद्रकांत

एम.ए., बी.एड., सेट, एम.फिल.

~: मार्गदर्शक :~

डॉ.बी.आर.भोसले

सहयोगी प्राध्यापक, (समाजशास्त्र विभाग),

यशवंत महाविद्यालय, नांदेड.

मे २०१९

"लातूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरीकांच्या मानवाधिकारांचे समाजशास्त्रीय अध्ययन"

१.१ प्रस्तावना :-

समाजशास्त्रामध्ये विविध सामाजिक संबंध, सामाजिक समस्या, सामाजिक संस्था, मानवाची बाल्यावस्था ते वृद्धावस्था, मानवी वर्तन, मानवाधिकार, नातेसंबंध, रुढी, परंपरा, नैतिकमूल्य इत्यादी बाबींचा अभ्यास केला जातो. समाजातील प्रत्येक घटकाचा विकास होण्यासाठी त्याला पोषक वातावरणाची गरज असते. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा विकास साधता यावा म्हणून त्यांना समप्रमाणात कायद्याची व अधिकाराची निर्मिती करण्यात आलेली आहे. परंतु अधिकार व कायद्याची योग्य प्रमाणात अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे समाजातील अनेक घटक आपल्या विकासापासून वंचित राहतात आणि मोठ्या प्रमाणात वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जाताना पहावयास मिळतात. आपल्या समाजात ज्येष्ठ नागरिकांचा फार मोठा वर्ग आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या विविध सामाजिक, आर्थिक, आरोग्य, निवास, सुरक्षा इत्यादी समस्या विषयक सोडवणूक करणे अत्यंत आवश्यक आहे. या अनुषंगाने ज्येष्ठ नागरिकांना वृद्धापकाळामध्ये आर्थिक क्षमता, कामाचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि सार्वजनिक मदत मिळण्यासाठी राज्य शासनाने ज्येष्ठ नागरिक धोरण जाहिर केले आहे. या धोरणानुसार ६५ वर्षाच्या वर वय असलेल्या सर्व व्यक्तींना वयस्कर व्यक्ती समजण्यात येईल. ही व्याख्या जात, वंश, लिंग, शैक्षणिक किंवा आर्थिक दर्जापासून स्वतंत्र असेल अशी करण्यात आली आहे.

भारतीय संविधानामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता इत्यादी स्वरुपाचे मूलभूत हक्क आहेत. मानवाधिकार हे मानवाचे मूलभूत हक्क आहेत. मानवी हक्क हे जागतिक असून सर्वांना समान असतात तसेच हे हक्क उपजत असतात आणि कायदेशीर सुद्धा. त्यापैकी काही मानवी हक्क प्रमुख मानले जातात. जसे की - जीवनाधिकार, यातनांपासून मुक्तता, गुलामगिरीपासून मुक्तता, कोर्ट सुनवाईचा अधिकार, भाषण स्वातंत्र्य, वैचारिक व धार्मिक स्वातंत्र्य इत्यादी आहेत.

मानवी समाजात ज्येष्ठ नागरीकांचा वर्ग दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे त्यांना विविध सामाजिक, मानसिक, शारीरिक, आर्थिक, आरोग्य, निवास व सुरक्षितता विषयक समस्यांची सोडवणूक करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण, भारतात एकूण लोकसंख्येच्या १/८ लोकसंख्या ज्येष्ठ नागरीकाची आहे. त्या व्यक्तींपैकी जास्तीत जास्त व्यक्ती आपल्या कामकाजापासून निवृत्ती न घेता, जोपर्यंत शारीरिक कार्यक्षमता आहे तोपर्यंत कार्यरत राहतात. परंतु, वाढत्या वयांमुळे त्याची अर्थार्जन करण्याची क्षमता कमी होत असते. त्यामुळेच त्यांच्या एकूण राहणीमानावर त्याचा परिणाम होतो. त्यासाठी त्यांना जीवन जगण्यास मदत होणे गरजेचे आहे आणि ते वास्तवात उतरवायचे असेल तर ज्येष्ठांना मानवी अधिकाराच्या माध्यमातून मदत झाल्यास शक्य आहे.

व्यक्तिच्या एकूण आयुष्यातील शेवटची अवस्था म्हणजे ज्येष्ठता होय. या अवस्थेत व्यक्तीच्या शरीराच्या विविध अवयवांची कार्यक्षमता कमी-कमी होत जाते. पूर्वी वृद्ध व्यक्तीकडे दुर्लक्ष केले जात होते. आजही त्यात विशेष बदल झाला नसला तरी त्यांच्यासाठी आज ज्येष्ठ नागरीक (Senior Citizen) ही संज्ञा वापरली जाते. काही तज्ज्ञांच्या मते वृद्धत्त्व जीवशास्त्रीयअवस्थेपेक्षा सामाजिक संरचना आहे. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक दृष्टीने विचार करता, वृद्धत्त्वाचे महत्त्व स्थळ, काळानुसार वेगवेगळे आहे. आज साधारणतः ६० वर्षापेक्षा जास्त वयाच्या व्यक्तीसाठी 'ज्येष्ठ नागरीक' ही संज्ञा वापरली जाते.

प्रत्येक नागरिकाला समान हक्क व न्याय मिळण्यासाठी मानवाधिकाराची निर्मिती करण्यात आली. तसेच मानवाधिकारासंबंधीत आंतरराष्ट्रीय कायदे करुनसुद्धा त्याचा समाजातील प्रत्येकाला समप्रमाणात फायदा झाला नाही. आजच्या सद्य:स्थितीमध्ये ज्येष्ठ नागरीक हा विविध समस्येने वेढला गेला आहे. त्यांना स्वातंत्र्य, हक्क व अधिकार असताना सुद्धा त्यांचं जीवन निराशामय आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्य करणाऱ्या संस्था तसेच ज्येष्ठांसाठी निर्धारीत केलेली धोरणे याची सर्व माहिती ज्येष्ठांना व्हायला हवी त्यांचे प्रबोधन करावयास हवे. ज्येष्ठ व्यक्तींना तसेच तरुण पिढीला समायोजनाचे प्रशिक्षण द्यावयास हवे. ज्येष्ठांना त्यांचे उर्वरित आयुष्य सुखी, समाधानी, आनंदी जगता यावे व त्यांचे अधिकाधिक समाज प्रबोधन व्हावे यासाठी प्रस्तुत विषय संशोधनासाठी हाती घेण्यात आलेला आहे.

१.२ विषयाची निवड :-

आजपर्यंत वृद्धांसाठी कुटुंबसंस्था हा सर्वात महत्त्वाचा आधार होता. आज त्यालाच हादरे बसू लागले आहेत. भारतात आधुनिकीकरणाबरोबरच पाश्चिमात्यीकरणही सुरु आहे. त्यामुळे व्यक्तीचे राहणीमान, कुटुंबपद्धतीत रचना व शैलीच्या दृष्टीने मूलभूत बदल होत आहेत. सध्या भारतात संयुक्त कुटुंबपद्धतीचे प्रमाण घटत आहे. त्यात 'छोटे कुटुंब - सुखी कुटुंब' ही परंपराही फार विस्कळीत होत चालली आहे. त्या जागी 'करारपद्धतीचा विवाह' करुन 'अल्पकालीन कुटुंबव्यवस्थेचे' वारे जगभर वाहू लागले आहे. या बदलामुळे वृद्धांची सामाजिक व सांस्कृतिक सुरक्षा धोक्यात आली आहे. त्यामुळे सामाजिक जीवनात वृद्ध विस्थापित होत आहेत. बहुतेक वृद्ध कुटुंबात राहूनही उपेक्षित, दुर्लक्षित जीवन जगत आहेत. भारतीय कायद्यामध्ये सर्वांना सुखी, समाधानी जीवन जगता यावे यासाठी सर्वसमावेशक हक्कांची व अधिकारांची निर्मिती केलेली आहे. सर्वांना समान हक्क व अधिकार असताना सुद्धा ज्येष्ठ नागरिकांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल जात आहे. त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे जीवन जगता येत नाही, संपत्ती व मालमत्ता हिसकावून घेतली जाते, गुलामगिरीचे जीवन जगण्यास भाग पाडले जाते. ग्रामीण भागाच्या तुलनेमध्ये शहरी भागातील ज्येष्ठ नागरिकांना अधिकाधिक वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. शहरी भागातील ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी व त्यांना त्यांच्या अधिकाराची जाण करुन देण्यासाठी "लातूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरीकांच्या मानवाधिकारांचे समाजशास्त्रीय अध्ययन" हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

१.३ संशोधन विषयाचे महत्त्व :-

भारतीय समाजामध्ये आजपर्यंत पाश्चिमात्य राष्ट्रांच्या तुलनेत ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या फारशा तीव्रपणे जाणवत नव्हत्या. याची कारणे भारतातील कुटुंबव्यवस्थेत सापडतात. आजपर्यंत भारतीय कुटुंबव्यवस्था कुटुंबातील सर्व सदस्यांच्या सुख-दुःखाची जबाबदारी मरेपर्यंतोघ असे. त्यामुळे भारतातील वृद्धांची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक सुरक्षा सुरक्षित होती. वृद्धांना कुटुंबातआदराचे स्थान होते. ही वृद्ध माणसे संस्काराचे आणि सामाजिक विधीचे वाहक मानले जात असत. ज्येष्ठांच्यावर्तमान स्थितीचा विचार केला असता, भारताने आर्थिक धोरण बदलले. त्यामुळे शासकीय योजना, कल्याणकारी उपक्रम व इतर सोयी-सुविधा यावरील गुंतवणूक कमी होऊन खाजगी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन मिळाले. उद्योगधंद्यांच्या वाढीमुळे रोजगाराच्या अनेक संधी निर्माण झाल्या. मात्र हे बहुतांशी रोजगार महानगरांत निर्माण झाले.

(...४)

त्यामुळे महानगरे ही रोजगाराची केंद्रे बनली अन् खेडी मात्र भकास झाली. खेड्यांतील लोक आपल्या मुलाबाळांचे शिक्षण, पालणपोषण करतात. ही मुलं मात्र शिक्षण घेऊन शहरांत स्थायिक होतात. तेव्हा कुटुंबाशी असलेली त्यांची नाळ आपोआपच तुटते. त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या म्हाताऱ्या आई - वडिलांचे मात्र हाल होतात. ज्या ज्येष्ठांनी तरुणपणी आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणावर केलेली गुंतवणूक पुढे तिची फळे त्यांना मिळायला पाहिजे होती. परंतु ही गुंतवणूकच दिवाळखोरीत निघत आहे.

ग्रामीण भागांतून शहरांत स्थलांतरीत झालेल्या कुटुंबाची घडी बसवता बसवताच लोकांचे सर्व तारुण्य खर्ची पडते. घर बांधणे, मुलांचे शिक्षण करणे आणि कुटुंबाचे पालनपोषण करण्यात लोकांची शक्ती खर्च होते. कुटुंबाला स्थिरता येण्याची वेळ तर मुलाबाळांचे पुन्हा स्थलांतर, त्यांच्या वास्तव्याचे प्रश्न आणि ज्येष्ठांचे सुरक्षेचे प्रश्न तीव्रतेने कुटुंबाला भेडसावतात. या सर्व पैलूंचा अभ्यास करणे आवश्यक आहे. शहरांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे जीवनमान कसे आहे, त्यांच्याशारीरिक, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक सुरक्षेचे कोणते प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रश्नांची कोणती टोके पुढे येत आहेत यांचा अभ्यास करुन भविष्यात या ज्येष्ठांना सुखी आणि समृद्ध जीवन जगण्यासाठी कोणते उपाय करावे लागतील यांचा शोध घेणे गरजेचे आहे. म्हणून एकविसाव्या शतकात पदार्पण झालेले असतानाच या समस्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. अशा अभ्यासातून ज्येष्ठांच्या सुरक्षेचे उपाय शोधता येतील. सामाजिक रचनेत उपयुक्त असे बदल कायद्याने करण्यासाठीही असा अभ्यास महत्त्वाचा ठरणार आहे. वाढती ज्येष्ठांची संख्या लक्षात घेऊन ही लोकसंख्या सक्रिय ठेवण्यासाठी, अभ्यास निश्चितच दिशादर्शक ठरणार आहे. याच हेतूने 'लातूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या मानवाधिकारांचे समाजशास्त्रीय अध्ययन' हा विषय हाती घेतला आहे.

१.४ संशोधनाची उद्दिष्टे :-

कोणत्याही स्वरुपाचे कार्य करण्यासाठी त्या विषयाची उद्दिष्ट्ये ठरवावी लागतात. जर उद्दिष्ट्ये ठरली नाहीत तर ते कार्य दिशाहीन स्वरुपाचे होते व त्या विषयाला योग्य न्याय मिळत नाही. तसेच अभ्यासाला एक नेमकी दिशा मिळावी, अभ्यासात सखोलता यावी म्हणून अभ्यासविषयाची उद्दिष्ट्ये मांडली जातात. उद्दिष्टांची रचना स्पष्ट व वस्तुनिष्ठ स्वरुपाची केली तर अभ्यासाची सप्रमाणता व विश्वसनीयता याच्यात वाढ होऊन अभ्यासाच्या सार्वत्रिक सत्यता या मूल्यात वाढ होते. प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्टे ठरवलेली आहेत.

१. ज्येष्ठ नागरिकांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे अध्ययन करणे.

२. ज्येष्ठ नागरिक व मानवाधिकारांच्या पायमल्लीचा अभ्यास करणे.

३. ज्येष्ठ नागरिकांची सद्य:स्थिती अभ्यासणे.

४. ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्यांचा अभ्यास करणे.

५. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्यांचे मानवाधिकारांच्या दृष्टीकोणातून विश्लेषण करणे.

१.५ गृहितकृत्ये :-

सामाजिक शास्त्रामध्ये शास्त्रीय ज्ञानाची निर्मिती करण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब केला जातो. या पद्धतीचा अवलंब करण्यासाठी संशोधकाला संशोधन आराखड्याचे पूर्वज्ञान असणे आवश्यक असते. एखाद्या विषयाचा अभ्यास करण्यापूर्वी त्या विषयासंदर्भात काही उपकल्पना मनात गृहित धराव्या लागतात त्या उपकल्पना आपल्या पूर्वज्ञानाशी संबंधीत असतात. तसेच त्या विषयासंदर्भात संभाव्य अंदाज बांधावे लागतात. त्यामुळेच संशोधकाला आपल्या संशोधनाची दिशा आणि गती ठरवण्यात मदत होते. गृहित विधानावर संशोधनाच्या निष्कर्षाचे बरेचसे स्वरुप अवलंबून असते. गृहितके ही संशोधकास मार्गदर्शक म्हणून मदत करतात. वैज्ञानिक अभ्यास पद्धतीतील एक अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजेच गृहितकृत्य होय. यालाच परिकल्पना, उपकल्पना, अभ्युपगम असेही म्हणतात.

गुड आणि हॅट यांच्या मते - "गृहितकृत्य ही अशी मान्यता आहे की, जी सत्य सिद्ध करण्यासाठी तिचे प्रयोगात्मक परिक्षण केले जावू शकते आणि पुढील संशोधनासाठी ते उपयुक्त असते." गृहितकृत्य हे सत्य किंवा असत्य असू शकते. गृहितकृत्य हे अर्मूत सिद्धांत आणि मूर्त तथ्य यांना जोडणारा एक दुवा आहे. त्यामुळे संशोधनात गृहितकृत्यांना अत्यंत महत्त्व आहे. परंतु गृहितकृत्य निर्माण करणे हे साधे व सोपे कार्य नाही. त्यासाठी संशोधकाचा अभ्यास, त्याचे चिंतन, अनुभव त्यांचे प्रयत्न या सर्वांच्या आधारावर गृहितकृत्याची निर्मिती होत असते. प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी खालील गृहितकृत्य निश्चित केलेली आहेत.

१. मानवाधिकाराचा उपयोग न्याय मिळविण्यासाठी ज्येष्ठ नागरिक करत नाहीत.

२. ज्येष्ठ नागरीकांच्या मानवी अधिकारांची समाजात पायमल्ली होत आहे.

३. ज्येष्ठ नागरिकांची पूर्वीची आर्थिक परिस्थिती व आजची परिस्थिती यामध्ये फरक आहे.

४. ज्येष्ठ नागरिक अनेक समस्यांना सामोरे जात आहेत.

५. पुरुषांच्या तुलनेत स्त्री ज्येष्ठ नागरिकांची स्थिती अतिशय दयनीय आहे.

६. आजची पिढी ज्येष्ठ नागरिकांकडे लक्ष देत नाही.

१.६ नमुना निवड :-

सामाजिक संशोधनात नमुना निवड पद्धतीचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. सामाजिक संशोधनातील अभ्यास विषयात एवढी गुंतागुंत असते की त्यात गुंतलेल्या प्रत्येक घटकांचा सांगोपांग अभ्यास करणे केवळ अशक्य बाब आहे. म्हणूनच नमुना निवडीचा वापर केला जातो. वेळ, श्रम आणि पैशाच्या दृष्टीने नमुना निवडीचे महत्त्व तर अधिकाधिक आहे. यामध्ये समष्टीतील प्रत्येक घटकांचा संशोधकाने प्रत्यक्ष अभ्यास न करता सर्व घटकांचे प्रतिनिधित्व करतील अशा काही घटकांचा सखोल अभ्यास केलेला असतो. म्हणजेच समग्रातील एकूण एककांपैकी काही प्रतिनिधिक एककाची निवड करणे म्हणजेच 'नमुना निवड' होय. त्यास न्यादर्शन असे सुद्धा संबोधले जाते.

'शितावरुन भाताची परीक्षा' अशी म्हण समाजात रुढ आहे. हा एक नमुना निवडीचा प्रकार आहे. भाताची परीक्षा करण्यासाठी प्रत्येक शिताची परीक्षा घेणे गरजेचे नाही. तर भाताचा एक शित सुद्धा वस्तुस्थितीची कल्पना देवू शकतो. सामाजिक संशोधनामध्ये सुद्धा हा नियम लागू पडतो. त्यामुळेच संशोधनामध्ये एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणून नमुना निवडीचा उपयोग केला जातो. डॉ. गुड व हॅट च्या मते "नावाप्रमाणेच नमुना म्हणजे समग्राचा लहानसा प्रतिनिधी होय." तर श्रीमती पी. व्ही. यंग म्हणतात - "जो सांख्यिकीय नमुना निवडलेला असतो त्या सामग्रीचे लहान चित्र म्हणजे नमुना होय." सामाजिक संशोधनात नमुना निवड पद्धती हा वैज्ञानिक अध्ययनाचा एक भागच झाला आहे. अध्ययन विषयाचे स्वरुप, त्याची व्याप्ती, उपलब्ध वेळ इत्यादी सर्व दृष्टिने अनुकूल ठरेल असाच नमुना निवडीचा प्रकार असला पाहिजे. समग्रातील एककांना नमुन्यामध्ये निवडून येण्याची संभाव्यता आहे किंवा नाही या आधारावर नमुना निवडीचे दोन प्रकार पडतात.

१.६.१ संभाव्यता नमुना निवड :-

संशोधन समग्रातील सर्व एककांच्या निवडीची संभाव्यता ही सारखीच असते, अशा पद्धतीला संभाव्यता नमुना निवड पद्धती असे म्हणतात.(४) या पद्धतीमध्ये समग्रातील प्रत्येक एककाला नमुना निवड होण्याची संधी असते. समग्राच्या सर्व घटकांना समान महत्त्व देवून नमुना म्हणून त्याच्या निवडीसाठी समान संधी देणे या उद्देशाने ही प्रणाली अस्तित्त्वात आणल्या गेली यामध्ये संशोधकाच्या इच्छेचा किंवा पक्षपातपणाचा कोणताही परिणाम होत नसतो. म्हणजेच दोन्ही घटकासाठी संभाव्यता ही समानच असते. संभाव्यता नमुना निवडीचे प्रामुख्याने पाच प्रकार पडतात.

१. सादा यादृच्छीक नमुना

२. स्तरित यादृच्छीक नमुना

३. व्यवस्थाबद्ध नमुना

४. बहुपदी किंवा एकक पुंज नमुना

५. बव्ह्यवस्तीय नमुना

१.६.२ गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धती :-

संभाव्यता नमुना निवडीच्या अगदी विरुद्ध असे या पद्धतीचे स्वरुप आहे. जेव्हा समग्रातील सर्व एककांची नमुन्यामध्ये निवड होण्याची शक्यता किंवा संभाव्यता नसते तेव्हा त्या पद्धतीस गैर संभाव्यता नमुना निवड पद्धती असे म्हणतात. या पद्धतीत संशोधन क्षेत्रातील एककांची संख्या किती आहे हे संशोधकाला माहित नसते आणि त्या समग्रातील प्रत्येक एककाला निवडले जाण्याची शक्यता अथवा संभाव्यता किती प्रमाणात आहे हे संख्येच्या किंवा टक्केवारीच्या परिभाषेत मांडता येत नाही. या पद्धतीत संशोधनकर्ता आपल्या इच्छेनुसार नमुना निवडतो त्याच्यावर कोणतेही नियंत्रण नसते. जेव्हा संशोधन समग्रातील एककाची पूर्णपणे माहिती संशोधनकर्त्याला नसते, त्यावेळी संभाव्यता नमुना निवड पद्धतीने नमुना म्हणून निवड करणे अशक्य असते. आशावेळी ही पद्धती उपयुक्त ठरते. गैरसंभाव्यता किंवा असंभाव्यता नमुना निवडीचे चार प्रकार आहेत.

१. सोयीस्कर किंवा सुविधाजनक नमुना

२. सहेतूक किंवा उद्देशपूर्ण नमुना

३. कोटा किंवा बहुहिस्सा नमुना

४. स्वयंनिर्वाचीत नमुना

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी संशोधकाने गैरसंभाव्यता नमूना निवड या प्रकारातील सहेतूक नमुना निवड हा प्रकार निवडलेला आहे. नमुना निवडीचा हा प्रकार अगदी सोपा आहे. ज्यावेळी संशोधक एखादा विशिष्ट हेतू किंवा उद्देश समोर ठेवून काही एककांची निवड करतो. त्यावेळी त्या नमुना निवड पद्धतीला सहेतूक किंवा उद्देशपूर्ण नमुना निवड पद्धत असे म्हणतात. प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने एकूण २०० नमुन्याची निवड केली आहे.

१.७ संख्यात्मक व गुणात्मक संशोधन पद्धती :-

सामाजिक संशोधन पद्धतीमध्ये संख्यात्मक आणि गुणात्मक संशोधन पद्धतीला विशेष असे म्हत्त्वाचे स्थान आहे. या दोन्ही पद्धतीच्या संमिश्र वापरातून अधिकाधिक वस्तुनिष्ठ व वैज्ञानिक सिद्धांत मांडण्यास मदत होते. त्यामुळेच या दोन्ही पद्धतीला तेवढेच महत्त्वाचे स्थान आहे. संख्यात्मक व गुणात्मक संशोधन पद्धती विषयी अधिक माहिती खालील प्रमाणे -

१.७.१ संख्यात्मक संशोधन पद्धती :-

परिणात्मक अथवा संख्यात्मक पद्धती ही अध्ययनाची एक पद्धती आहे. तथ्यांचे संकलन करणे, विश्लेषण करणे आणि निष्कर्ष काढणे यांच्याशी संख्यानाम पद्धती निगडित आहे. कोणत्याही सामाजिक घटनेचे यथार्थ अध्ययन करण्यासाठी संख्यात्मक पद्धतीचा उपयोग केला जतो. समाजशास्त्रीय संशोधनात संख्यानाम पद्धतीचा उपयोग गिडिंग्ज या समाजशास्त्रज्ञाने केला. अधिक वस्तुनिष्ठ, काटेकोर, निश्चित व नेमके विधान करता यावे म्हणूनच सामाजिक शास्त्रात संख्यामान पद्धतीचा मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यात येतो. सामाजिक घटनासंबंधी तथ्ये संकलित करणे, तथ्यांचे वर्गीकरण आणि सारणीकरण करुन त्यांना सोपे व्यवस्थित आणि बोधगम्य करण्यासाठी संख्यानाम पद्धतीचा उपयोग केला जातो.

केन्डाल यांच्या मते - "नैसर्गिक घटनेच्या संदर्भातील लोकसमूहाच्या लक्षणांचे गणन व मापन करुन त्यांची माहिती ज्या तंत्राने गोळा केली जाते अशा वैज्ञानिक पद्धतीला संख्यात्मक पद्धती असे म्हणतात." सर्वसाधारण अर्थाने ज्या पद्धती संख्या अथवा मापाला विशेष महत्त्व देतात त्यालाच परिमाणात्मक अथवा संख्यात्मक पद्धती असे म्हणतात. सामाजिक संशोधनातील अशी तथ्ये ज्यांचे मापन संख्यात्मक स्वरुपात केले जावू शकते असे सर्व संशोधन परिमाणात्मक संशोधन संबोधल्या जाते.

परिमाणात्मक अथवा संख्यात्मक पद्धतीमध्ये सामाजिक सर्वेक्षणाला विशेष महत्त्व आहे. निरीक्षण, प्रश्नावली, अनुसूची तसेच मुलाखत पद्धती ह्या गणनात्मक पद्धतीच मानल्या जातात. या पद्धतीद्वारे सूचना व तथ्य संकलन केल्यानंतर सारणीकरण केले जाते. तसेच सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारावर निष्कर्ष काढले जातात. या पद्धतीने काढलेले निष्कर्ष अधिक वस्तुनिष्ठ, काटेकोर, निश्चित व नेमके असतात म्हणूनच सामाजिक संशोधनात संख्यात्मक पद्धतीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.

१.७.२ गुणात्मक संशोधन पद्धती :-

व्यक्तीचे जीवनमान, राहणीमान, विचार, दृष्टिकोन, मनोवृत्ती, विश्वास, चातुर्य, प्रेम, द्वेष, तिरस्कार, जातीय विद्वेष यासारख्या अमूर्त घटनांचे मोजमाप गणनात्मक किंवा सांख्यिकीय पद्धतीने करता येत नाही आणि अशा सामाजिक घटनांनाच सामाजिक शास्त्रात महत्त्वाचे स्थान असते. कारण त्यावरच कोणत्याही समाजाची प्रगती अथवा परागती ठरविता येते. त्या आधारावरच महत्त्वपूर्ण सिद्धांत व निष्कर्षाचे प्रतिपादन केले जाते. त्यासाठी गुणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला जातो. जेव्हा संशोधनाचा विषय केवळ संख्यात्मक तथ्यावर आधारित न राहता गुणात्मक तथ्यावर आधारित असतो तेव्हा त्याला गुणात्मक संशोधन पद्धती या नावाने ओळखले जाते. गुणात्मक पद्धतीमध्ये केवळ गुणांनाच महत्त्व दिले जाते, संख्येला नाही.

मानवी व्यवहारांचे विश्लेषण, उपभोक्त्यांच्या व्यवहारांचे विश्लेषण, प्रशासकीय कुशलता तथ्यसामग्रीचे विश्लेषण, जाहिरात कला, अभिप्रेरणासंबंधीचे शोध इत्यादी उदाहरणे हे गुणात्मक संशोधनाचे म्हणून सांगता येतील. सामाजिक शास्त्रात संकलन प्राप्त झालेली तथ्ये गुणात्मक आणि संख्यात्मक अशा दोन्ही स्वरुपाची असली तरी गुणात्मक तथ्यांनाही विशेष महत्त्व असते. गुणात्मक तथ्यांना संख्येत बदलणे अध्ययनाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्यामुळे संख्यात्मक स्वरुपात असलेल्या

तथ्यांचे विश्लेषण व अर्थ निरुपण करणे सोपे जाते व निष्कर्षही संख्येत देता येतो. त्यासाठी समाजशास्त्रात अनुमापन तंत्राचा उपयोग केला जातो. ज्या मोजमाप पद्धतीमुळे गुणात्मक व अमूर्त तथ्यांना अथवा घटनांना गणनात्मक स्वरुप देता येते.

सामाजिक शास्त्रातील तथ्य ही गुणात्मक स्वरुपाची असतात. तसेच सामाजिक घटना बहुतांश गुंतागुंतीच्या व परिवर्तनशील स्वरुपाच्या असतात. त्यामुळे त्याचे वस्तुनिष्ठ व गणनात्मक मापन करणे कठीण असले तरी गुणात्मक मापन पद्धतीद्वारे हे शक्य आहे. या गुणात्मक मापन पद्धतीमध्ये संख्यादर्शक अनुमापन, सामाजिक दूरत्वदर्शक अनुमापन, समाजमिती तंत्र, तीव्रता मापन तंत्र, श्रेणीसूचक मापन तंत्र, तुलनात्मक मूल्यांकन अनुमापन, दर्जा मूल्यांकन अनुमापन, स्वयंनिर्मित दर्जा अनुमापन, मतमापन, बोगार्डसचे सामाजिक दूरत्व मापन अनुमापन इत्यादी तंत्रांचा उपयोग करुन गुणात्मक तथ्यांचे अध्ययन केले जाते. सहभागी निरीक्षण, वैयक्तिक अध्ययन, आंतरवस्तू विश्लेषण आणि जीवन इतिहास ह्या समाजशास्त्रातील गुणात्मक पद्धती मानल्या जातात.

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी संशोधकाने एकंदरीत मिश्र संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. या दोन्ही पद्धतीच्या वापरातून मूर्त व अमूर्त अशा दोन्ही स्वरुपाच्या तथ्याचे एकत्रीकरण संशोधकाने केले आहे.

१.८ संशोधन आराखडा :-

मानवी जीवनातील कोणतेही कार्य सुव्यवस्थित पार पाडावयाचे झाल्यास प्रथम त्या कार्याचा आराखडा तयार करावा लागतो. व्यक्तींच्या दैनंदिन व्यवहारांचा आढावा घेतला तर असे स्पष्ट दिसते की, काही योजना आखूनच तो आपले उद्दिष्ट साध्य करीत असतो. मर्यादित साधनांच्या आधारावर अमर्यादित गरजा पूर्ण करावयाच्या असल्याने प्रत्येक व्यक्ती उपलब्ध पैसा, वेळ व शक्ती यांचा योजनापूर्वक पर्याप्त वापर करीत असतो. किंबहुना तसे केल्याशिवाय त्याला यश येत नाही. असल्या योजना आखल्यामुळेच त्या कार्याला सुसूत्रपणा किंवा व्यवस्थितपणा येतो. त्या कार्याचे पद्धतशीर नियोजन, त्याची रचना अथवा मांडणी करावी लागते. यालाच आराखडा असे म्हणतात. आराखड्याला 'अभिकल्प', 'प्ररचना' इत्यादी नावानेही ओळखले जाते. संशोधन आराखड्याचे प्रत्येक संशोधनासाठी विशेष महत्त्व आहे. हा एक संशोधनाचा व्यूह असतो. संशोधन आराखडा हा

संशोधन कर्त्याला एका दिपस्तंभासारखा असतो. संशोधनाची एक निश्चित दिशा प्रस्तुत करतो तसेच संशोधन प्रक्रियेच्या प्रत्येक पायरीवर योग्य ते मार्गदर्शन करतो. त्यामुळे संशोधन आराखडा हा संशोधकाचा एक प्रकारचा मार्गदर्शक असतो.

आर. एल. एकॉफ यांच्या मते "निर्णय क्रियान्वित करण्याची स्थिती येण्यापूर्वीच निर्णय निर्धारित करण्याच्या प्रक्रियेला आराखडा असे म्हणतात." संशोधन आराखडा तयार करणे ही एक गरज आहे. वास्तुशिल्प उभारण्यापूर्वी त्या वास्तुशिल्पाचा आराखडा तयार करणे जेवढे आवश्यक आहे, तेवढीच संशोधन कार्यात आराखड्याची आवश्यकता आहे. संशोधन आराखडा तयार केल्यामुळे त्या संबंधीचा अंदाज संशोधकाला निश्चितपणे मांडता येतो.

संशोधन आराखड्याचे प्रकार करतांना लक्षात घेतले जाते की संशोधनात कोणत्या उद्दिष्टाला महत्त्व आहे हे पाहूनच संशोधन आराखड्याचे स्वरुप ठरविले जाते. सामाजिक शास्त्रात संशोधनाचे उद्दिष्ट लक्षात घेवून चार प्रकारचे आराखडे महत्त्वाचे मानले जातात.

१. अन्वेषणात्मक / परिचयात्मक संशोधन आराखडा

२. वर्णनात्मक संशोधन आराखडा

३. निदानात्मक संशोधन आराखडा

४. प्रयोगात्मक संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी संशोधन आराखड्याच्या चार प्रकारापैकी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आलेला आहे. वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश उपलब्ध तथ्य, माहिती व आकडेवारीच्या आधारावर एखादी व्यक्ती, समूह, समाज, घटना किंवा कोणताही विषय अथवा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे, वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा असतो. त्यामुळे अध्ययनासाठी निवडलेल्या 'विषय वस्तूची' संपूर्ण माहिती असणे आवश्यक असते. माहिती सत्य व वास्तविक असेल तरच वैज्ञानिक अध्ययन होईल. संशोधन आराखड्याचा आधार विश्वसनिय तत्त्व व वास्तविकता हा असतो. या आधारावर तत्त्व व माहितीचे विश्लेषण केले जाते. या विश्लेषणातून प्राप्त नवीन माहितीचे अर्थनिरुपण केले जाते. या प्रक्रियेला वर्णनात्मक विश्लेषण असे संबोधले जाते आणि ज्या आराखड्याच्या केंद्रस्थानी या प्रक्रियेला ठेवले

(...१२)

जाते त्याला वर्णनात्मक संशोधन आराखडा असे म्हणतात. वर्णनात्मक संशोधन आराखड्यात अभ्यासविषयातील समूह व्यक्ती यांच्या वैशिष्ट्यांचे वर्णन असते.

१.९ तथ्य संकलन :-

तथ्य म्हणजेच जसे आहे तसे पाहणे किंवा त्याचे वास्तविक चित्र रेखाटणे होय. तथ्य अनुभवक्षम असल्याशिवाय विज्ञानात त्याचा स्वीकार केला जात नाही. ज्या तथ्यांचा अनुभव घेता येत नाही किंवा केवळ अपवाद म्हणून एखाद्या वेळीच घडले असेल, इतरांना त्याचा अनुभव येण्याची शक्यता नसेल अशा तथ्यांना स्वीकारण्याविषयी विज्ञान उदासिन असते म्हणून आपले ज्ञानेंद्रिये हीच तथ्ये प्राप्तीचे आधार आहेत. ज्ञानेंद्रियाच्या आधारे होणारा स्थितीबोध किंवा निरीक्षण म्हणजेच तथ्य होय. साधारणतः सत्य म्हणून स्वीकार करता येवू शकणाऱ्या आणि सर्वांचे एकमत होऊ शकणाऱ्या तसेच सर्वांना त्याचा अनुभव घेता येवू शकणाऱ्या घटनांना 'तथ्य' म्हणतात. म्हणजेच विज्ञानात तथ्य हे असे निरीक्षण आहे की ज्यांचा ज्ञानेंद्रियाद्वारे अनुभव घेता येतो.

गुड आणि हॅट यांच्या मते, "तथ्य एक अनुभव सिद्ध सत्यापनीय निरीक्षण आहे." तथ्य म्हणजे वास्तविक स्वरुपात घडून आलेली घटना होय किंवा जी वास्तविक स्वरुपात विद्यमान आहे. ज्ञानेंद्रियाच्या आधारे तिची जाणीव अथवा स्थितीबोध होत असतो. कोणत्याही घटनेत एकाहून अधिक तथ्ये नेमलेली असतात. अनेक तथ्ये मिळून एखादी घटना पूर्ण होत असते. घटना जितकी जटील व गुंतागुंतीची असेल तितकीच तथ्यांची श्रृंखलाही मोठी असते. परंतु कोणत्याही घटनेत तथ्यांचे प्रमाण किंवा त्यांची संख्या किती असावी हे निश्चितपणे सांगता येत नाही. कोणत्याही तथ्यांचे प्रत्यक्ष स्वरुपात अवलोकन करता येणे ही तथ्यांची आवश्यक अट आहे. म्हणजेच कोणत्याही तथ्याला अनुभवाचा पुरावा आवश्यक आहे. जिचा 'सत्य' म्हणून सर्वांकडून स्वीकार केला जातो अशी घटना म्हणजेच तथ्य होय.

सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. संशोधन कार्याची सुरुवात आणि समारोपसुद्धा तथ्यांच्या आधारानेच होत असतो. प्रस्थापित सिद्धांताचा पडताळा घेण्यासाठी व नवीन ज्ञान प्राप्त करुन त्यांच्या संदर्भात नवीन सिद्धांत प्रस्थापित करण्यासाठी तथ्यांची मदत होत असते. माहिती उपलब्ध नसलेल्या समस्येची ओळख करुन घ्यावयाची असेल तर तथ्य

संकलनाशिवाय दुसरा मार्ग नाही. तथ्य संकलन हा संशोधन कार्याचा आत्मा असतो. सामाजिक संशोधनात तथ्यांचे विभिन्न प्रकार व त्यांना प्राप्त करण्यासाठी विविध साधने उपलब्ध आहेत. अध्ययनाच्या स्वरुपानुसार ज्या तथ्य सामग्रीला इतर पद्धतीच्या तुलनेत अधिक महत्त्व आहे त्या पद्धतीला अधिक महत्त्व दिले जाते.

ढोबळमानाने तथ्य संकलनाच्या प्रकारांना दोन विभागात विभाजित केले जाते.

अ) प्राथमिक तथ्य सामग्री

ब) दुय्यम तथ्य सामग्री

प्राथमिक व दुय्यम तथ्य सामग्रीचे अर्थ विषद करताना प्रा. रॉबर्टसन आणि राईट म्हणतात की, "विशिष्ट संशोधन समस्येचा ऊहापोह करण्याच्या निश्चित हेतूसाठी जी माहिती संकलित केली जाते त्यास प्राथमिक सामग्री असे म्हणतात. तर जी माहिती काही इतर हेतूनी दुसऱ्यांनी जमा केलेली असते पण तिचा उपयोग संशोधन प्रकल्पात करुन घेतला जातो त्या माहितीस दुय्यम सामग्री असे म्हणतात."

अ) प्राथमिक तथ्य सामग्री :-

प्राथमिक स्त्रोत याचा अर्थ प्रथमतःच केलेले निरीक्षण किंवा प्रथम प्रयत्नातून एकत्र केलेले तथ्य होय. संशोधकाचा हा पहिला प्रयत्न असतो. यासाठी संशोधनकर्ता स्वतः घटना स्थळावर अथवा संशोधन क्षेत्रात जातो. समस्येशी संबंधीत अशा जिवंत व्यक्तीकडून अवलोकन, अनुसूची, मुलाखत, प्रश्नावली इत्यादी माध्यमातून माहिती व आकडेवारी गोळा केली जाते. जेथे प्रत्यक्ष संपर्क साधने शक्य नाही तेथे प्रश्नावली वापरता येते. अशा प्रकारे घटना स्थळावर व्यक्ती आणि वस्तूंपासून उपलब्ध झालेल्या तथ्य सामग्रीला 'प्राथमिक तथ्य सामग्री' असे म्हणतात. प्राथमिक स्त्रोत यात संशोधक आणि घटनास्थळ, घटनेतील व्यक्ती व वस्तू यात प्रत्यक्ष संपर्क प्रस्थापित करुन तथ्य एकत्रीत केलेली असल्यामुळे ती अधिक वस्तुनिष्ठ असतात.

ब) दुय्यम तथ्य सामग्री :-

दुय्यम तथ्ये ही संशोधक संशोधन क्षेत्रात स्वतः जावून संकलित करीत नाहीत तर इतर

व्यक्तींनी ती पूर्वीच संकलित केली असून ती लिखित स्वरुपाची असतात. अर्थात जी तथ्ये स्वत: संशोधकाची नसून इतर व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून ती संकलित केली जातात व ती त्यांच्या मालकीची असतात त्यांना 'दुय्यम तथ्ये' म्हणतात. त्याच्या संकलनासाठी ज्या पद्धतीचा उपयोग केला जातो त्याला दुय्यम तथ्य पद्धती असे म्हणतात. यात प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्र, अहवाल, जीवनी, पांडुलिपी, आत्मचरित्र, संस्मरण, दैनंदिनी, पत्रे इत्यादीच्या माध्यमातून प्राप्त केलेले सांख्यिकीय माहिती म्हणजेच दुय्यम सामग्री होय. दुय्यम स्त्रोताचे दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते. पहिला प्रकार म्हणजे व्यक्तीगत कागदपत्रे होय. आत्मचरित्र, आत्मकथा, दैनंदिनी, पत्रे इत्यादींचा समावेश व्यक्तीगत प्रलेखामध्ये होतो. दुसरा स्त्रोत म्हणजे सार्वजनिक कागदपत्रे किंवा प्रलेख होय. सार्वजनिक प्रलेखामध्ये शासकीय अथवा संस्थांचे रेकॉर्ड, पुस्तके, अहवाल, जनगणना अहवाल तसेच शिलालेख, स्तुप, उत्खननात प्राप्त झालेल्या वस्तू इत्यादी भौतिक वस्तुंचाही समावेश होतो.

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत या दोन्ही स्त्रोताचा उपयोग केला जाईल. प्राथमिक तथ्यसामग्री मधील मुलाखत अनुसूची वापरली जाईल तर दुय्यम तथ्यसामग्रीतील विविध ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, लेख इत्यादी संदर्भाचा आधार घेतला जाईल. संशोधनाच्या दृष्टीने विचार करता प्राथमिक व दुय्यम स्त्रोतामध्ये फार मोठा फरक आहे असे म्हणता येत नाही. कारण ते तथ्य विश्वसनीय व प्रचितीक्षम आहे. अशाच तथ्यांचा स्वीकार संशोधनात केला जातो. म्हणून दोन्ही सामग्रीचा उपयोग संशोधनात केला जाईल.

१.१० तथ्यांचे विश्लेषण आणि निष्कर्षाची मांडणी :-

वैज्ञानिक संशोधनाची प्रक्रिया केवळ तथ्य संकलन त्यांचे वर्गीकरण व सारणीयनएवढ्यानेच संपत नाही; तर त्या तथ्यांचे उचित विश्लेषण व निष्कर्षाची मांडणी करावी लागते व तथ्य विश्लेषण निर्वचनाच्या आधारावर नियमांचे प्रतिपादन करावे लागते. तथ्यांचे विश्लेषण हेकाल्पनिक व्यक्तिसापेक्ष किंवा मर्यादित स्वरुपाचे असून चालत नाही. एखाद्या संमिश्र व गुंतागुंतीच्या घटनेचे स्पष्टीकरण करताना अत्यंत तार्किक पद्धतीने त्यात समाविष्ट असलेले निरनिराळे घटक अलग करुन सांगणे म्हणजे तथ्यांचे विश्लेषण करणे होय.

१.१०.१ तथ्यांचे विश्लेषण :-

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधन विषयाला अनुसरुन संशोधकाने तथ्य संकलनासीमुलाखत अनुसूची तयार करुन तिच्या आधारे तथ्य संकलन केले जाणार आहे. याद्वारे मिळालेली तथ्यही अस्ताव्यस्त व विखुरलेली असतात. अशा विखुरलेल्या तथ्यांचा वापर विवेचनासाठी आणि विश्लेषणसाठी जसास तसा करणे अतिशय अवघड असते. म्हणून काही निकष आधार लक्षात घेऊन सर्व तथ्यांचे समानता, भिन्नता लक्षात घेवून विखूरलेली माहिती वर्गीकरणाने वेगवेगळ्या गटात साचेबद्ध करुन तिचे विभाजन होईल. त्यामुळे संशोधन करताना संक्षिप्त, मर्यादित आणि स्पष्ट स्वरुपातील तथ्य प्राप्ती होण्यास मदत होईल तसेच यामुळे तथ्य सामग्रीची परस्पर तुलना करुन समानता आणि भेद त्वरीत लक्षात येण्यास मदत होईल.

१.१०.२ तथ्यांचे सांकेतीकरण :-

उपलब्ध झालेल्या माहितीचे संख्यात्मक विवेचन करता यावे म्हणून त्यातील उत्तरांचे संकेतन करावे लागते. संकेतन याचा अर्थ मोठ - मोठ्या उत्तरांना विविक्षित संकेत किंवा प्रतिक देणे होय. मुळ स्वरुपात तथ्यांचे प्रतिकामध्ये रुपांतर करण्याच्या प्रक्रियेला तथ्यांचे सांकेतीकरण असे म्हणतात. प्रस्तुत संशोधन कार्य करताना मुलाखत अनुसूचीचा वापर करुन निवडलेल्या तथ्यंच्याद्वारे मिळालेल्या माहितीच्या आधारे तथ्यांचे सांकेतीकरण केले जाईल. हे संकेतीकरण करत असताना तथ्यांना संकेत देतांना अंकाचा आणि अक्षरांचा उपयोग केला जाणार आहे. अशा संकेतीकरणाच्या प्रक्रियेमुळे उत्तरांचे वर्गीकरण करणे सुलभ होते. ह्या संकेतीकरणामुळे तथ्य विश्लेषणाचे कार्यही सोपे होईल.

१.१०.३ तथ्यांचे सारणीकरण :-

सामाजिक संशोधनासाठी संकलित केलेल्या तथ्यांना किंवा आकड्यांना सुव्यवस्थित व सरळ स्वरुपात प्रस्तुत करणे म्हणजे 'सारणीकरण' होय. विस्तृत अर्थाने पाहिल्यास सारणीकरण म्हणजे तथ्यांना भिन्न - भिन्न स्तंभात एका क्रमाने प्रदर्शित करण्याची व्यवस्था होय. सारणीकरणामध्ये तथ्यांचे विभिन्न स्तंभ तयार करुन त्यांना विशिष्ट क्रम देवून त्या प्रत्येक स्तंभाला शीर्षक किंवा उपशीर्षक दिले जाते. त्यामुळे तथ्यांची अभ्यासाच्या दृष्टीने मांडणी करता येते. सारणीमुळे तथ्यांचे गुण विशेष माहिती पडतात. जमलेल्या विपूल तथ्यांचे संक्षिप्तीकरण करता येते व त्यावरुन तुलनात्मक अध्ययन करता येते. म्हणूनच संशोधनाच्या प्रक्रियेत सारणीकरण हे तंत्र अतिशय महत्त्वाचे आहे.

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम असे दोन्ही प्रकारचे तथ्य संकलन अंतर्भुत असल्याने संशोधकाने तक्ते, स्तंभ व सारणी या प्रकारात तथ्यांचे सारणीकरण करुन वापर केला जाईल. संशोधन तथ्यास विविध स्तंभ करुन त्या प्रत्येक स्तंभाला एक स्वतंत्र शीर्षक दिले जाईल. तसेच मुलाखत अनुसूचीतील वैयक्तिक माहिती, कौटुंबिक माहिती, सामाजिक माहिती, आर्थिक माहिती, मानवाधिकाराचा वापर इत्यादी विषयी माहिती अशा विविध मुद्यांना अनुसरुन सारणीकरण केले जाणार आहे. या सारणी करणातून बऱ्याच गोष्टी संक्षिप्तपणे मांडल्या जातील त्यामुळे वेळ, श्रम व पैसा यांची बचत होईल आणि लिखाण करताना तुलनात्मक व प्रमाणबद्ध विवेचन तसेच विश्लेषण करणे अतिशय सोपे काम होते.

१.११ संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :-

सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनासाठी एकापेक्षा जास्त संशोधन पद्धतीचा वापर केला तरी काही अडचणीमुळे थोड्याफार प्रमाणात त्यावर मर्यादा पडतात. 'लातूर जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या मानवाधिकारांचे समाजशास्त्रीय अध्ययन' या विषयाचा अभ्यास करताना खालील अडचणी संभवतात.

१. लातूर जिल्ह्यामध्ये राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठी आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी फक्त २०० ज्येष्ठ नागरिकांची नमुना म्हणून निवड केली आहे.

२. प्रस्तुत संशोधन विषयाचे अभ्यासक्षेत्र हे लातूर जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.

३. घरातील कुटुंबियासमोर ज्येष्ठ नागरिकांना माहिती देण्यासाठी मर्यादा येतात.

४. नमूना म्हणून निवडलेल्या उत्तरदात्यांनी दिलेली माहिती खरी आहे असे गृहित धरुन विश्लेषण करण्यात येईल.

१.१२ संशोधन साहित्याचे परिक्षण :-

प्रस्तुत संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या लेखन साहित्याचा आढावा घेवून संशोधन वस्तुनिष्ठपणे करण्यासाठी साहित्य परिक्षण महत्त्वपूर्ण आहे. ज्येष्ठ नागरिक व मानवाधिकार या विषयी अनेक संशोधनात्मक लेखन झालेले आहे. प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी अशा साहित्याचा प्रामुख्याने आधार घेतलेला आहे. तो खालील प्रमाणे -

१.१२.१ मगर विलास प्रा., "पुणे शहरातील ज्येष्ठ नागरिक संघाचा एक समाजशास्त्रीय अभ्यास", २०१२.

प्रा.विलास मगर यांचा संशोधनात्मक प्रबंध टिळक महाराष्ट्र पुणे विद्यापीठ, पुणे येथे असून प्रस्तुत संशोधनामध्ये ज्येष्ठ नागरिक व ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक असणाऱ्या ज्येष्ठ संघटना यांचा अभ्यास केला आहे. ज्येष्ठांना उद्‌भवणाऱ्या समस्या कोणत्या आहेत? त्या समस्या निर्माण होण्याची कारणे कोणती आहेत? याची सविस्तर माहिती दिलेली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी समाज व शासन यांच्याकडून कोणकोणत्या योजना आहेत याची माहिती त्यामध्ये आहे. ज्येष्ठ नागरिक संघाची गरज व त्यांच्यासाठी आवश्यक असणाऱ्या कल्याणकारी योजना याबाबत माहिती मिळते. संयुक्त कुटुंब पद्धतीचे विघटन व पाश्चात्यशैलीचे अनुकरण हेच कारणे ही ज्येष्ठ नागरिकांच्या दयनीय स्थितीला कारणीभूत आहेत, ज्येष्ठांच्या संघाची अत्याआवश्यकता आहे, शासनाने वेगवेगळ्या योजनाचे आयोजन करुन ज्येष्ठांचे कल्याण साधावे असे निष्कर्ष मांडलेले आहेत.

१.१२.२ तुपे नवनाथ डॉ., "ज्येष्ठ नागरिकांचा शरीर संवर्धन व सामाजिक - आर्थिक अभ्यास", २००८-२०१०.

तुपे नवनाथ यांचा हा संशोधनात्मक प्रकल्प प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग पुणे विद्यापीठ, पुणे येथे असून प्रस्तुत संशोधनात ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्या, स्थिती व गती, ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न, ज्येष्ठांसाठी आखलेली राष्ट्रीय धोरणे, ज्येष्ठ नागरिकांची सामाजिक - आर्थिक सुरक्षा, आरोग्य सुरक्षा, ज्येष्ठ नागरिकांच्या अपेक्षा इ. विषयी चर्चा केली आहे. कित्येक ज्येष्ठ नागरिक हे आर्थिकदृष्ट्या परावलंबी आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी सरकारी दवाखान्यात स्वतंत्र कक्ष उभारावेत, प्रत्येक गावात ज्येष्ठ नागरिक संघ स्थापन करावेत. शासनाने प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाला स्मार्ट कार्ड द्यावे. या कार्डाचा उपयोग सर्व ठिकाणी करता यावा असे निष्कर्ष निघाले आहेत.

१.१२.३ गुप्ता सुभाष डॉ., शर्मा कंचन डॉ."वृद्ध महिलाओं की उपेक्षा, शोषण एवं समस्याएँ", २००९.

अर्जुन पब्लिशिंग हाऊस नवी दिल्ली यांनी हे पुस्तक प्रकाशित केलेले असून या पुस्तकामध्ये वृद्ध महिलांच्या समस्या विषयी संशोधनात्मक लिखान केले आहे. पाश्चात्याचा प्रभाव व

आधुनिकीकरणामुळे भारतीय मूल्यावर प्रभाव पडला आहे. त्यामुळेच प्रमुख भारतीय संस्थांना आघात पोहचला आहे. कुटुंब पद्धतीचा विचार केला असता आज स्त्रियांचे स्थान बदलले आहे. वृद्ध स्त्रियांना पूर्वी जे स्थान होते ते आज राहिलेले नाही. त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वृद्ध स्त्रियांची आजची स्थिती वाईट आहे. पूर्वीचा मान - सन्मान राहिला नाही. पूर्वीच्या काळी वृद्ध महिला ऐश - आरामात राहून मार्गदर्शन करत होती परंतु आजची महिला ही वाईट परिस्थितीमुळे मजुरी करुन वृद्धाश्रमात राहून जीवन जगत आहे. अशा स्वरुपाचे संशोधनात्मक लिखान करुन त्या समस्या सोडवण्यासाठी सर्व स्तरातून कोणते उपाय करता येतील याचा उल्लेख संबंधीत पुस्तकामध्ये केलेला आहे.

१.१२.४ शिसोदिया सुनील डॉ. "वृद्धावस्था के विविध आयाम" २००९.

निहारीका पब्लिकेशन दिल्ली यांनी हे पुस्तक प्रकाशित केले असून या पुस्तकामध्ये वृद्धावस्था म्हणजे काय? वृद्धांच्या विविध समस्या, वृद्धावस्था थांबवण्यासाठीचे प्रयत्न, वृद्धावस्थेत तारुण्य, जेवणातील आवश्यक माहिती शरीरासाठी आवश्यक असलेले व्यायामाचे प्रकार, वृद्धावस्थेतील प्राणायाम, वृद्धांसाठी पौष्टिक आहार, वृद्धांची लैंगिक भावना, वृद्धांसाठी योग्य प्रकारची मालिश, वृद्धावस्थेतील कामे, वृद्धावस्थेतील नैराश्य इत्यादीविषयी सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. वृद्धावस्थेतील विविध अवस्था व त्या - त्या वेळी घ्यावयाचे आहार इत्यादी विषयी लेखन प्रस्तुत पुस्तकामध्ये केलेले आहे.

१.१२.५ तुपे नवनाथ डॉ. "ज्येष्ठ नागरिक वास्तव आणि समस्या" २०१०.

निरंतर प्रौढशिक्षण व ज्ञानविस्तार विभाग पुणे विद्यापीठ, पुणे प्रस्तुत अध्ययन साहित्यामध्ये वार्धक्याचा अर्थ स्पष्ट करुन, प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेत ज्येष्ठांचे स्थान कशा स्वरुपाचे होते हे स्पष्ट केले आहे. परंतु सध्या बदलते समाजवास्तव आणि ज्येष्ठांचे प्रश्न तसेच ज्येष्ठांची वाढती लोकसंख्या, वार्धक्याच्या समस्या, वार्धक्यातील वेगवेगळे आजार जसे - नेत्ररोग, बहिरेपणा, दात पडणे, अस्थिसंस्था, सांधेदुःखी, मज्जासंस्था, रक्ताभिसरण इ. विषयी सविस्तर लिखान केले आहे. ज्येष्ठ नागरिकांची लोकचळवळ यामध्ये ज्येष्ठ नागरिक संघ, वृद्धाश्रम, विरंगुळा केंद्र, विरंगुळा केंद्राची उद्दिष्टे इत्यादी विषयी लिखान केले आहे. ज्येष्ठ नागरिकांना सरकारी योजनाची मदत व मदत करणाऱ्या संस्थेची माहिती देण्यात आली आहे.

१.१२.६ देशपांडे विकास (अनु.), लेव्हिन लिआ (ले.), "मानवी हक्क प्रश्न आणि उत्तरे", २००९.

नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडियाद्वारा प्रकाशित करण्यात आलेल्या या पुस्तकामध्ये मानवी अधिकारांच्या संदर्भात विविध प्रश्न व त्याची समर्पक उत्तरे दिलेली आहेत. मानवाधिकार अंतर्गत एकूण ३० कलमाचे सविस्तर स्पष्टीकरण केलेले आहे. आंतरराष्ट्रीय मानवी अधिकारविषयक कायद्यांचे माहितीकरण आणि विकास वेगाने होत आहे. तरीही, जगाच्या विविध भागात दररोज मानवी हक्कांवर अतिक्रमण होत आहे, कारण या कायद्याच्या अंमलबजावणीचे यश अनेक बाबीवर अवलंबून आहे. त्यापैकी एक महत्त्वाचा घटक म्हणजे मानवी अधिकारांचे आणि मूलभूत स्वातंत्र्याबाबतचे योग्य ज्ञान हे ज्ञान असेल तरच त्यांचे पालन होवू शकेल. मानवी अधिकारांबाबतचे शिक्षण हे युनेस्कोचे महत्त्वपूर्ण कार्यक्षेत्र आहे. मानवी हक्कांची अंमलबजावणी हा लोकशाही मूल्यांवरील निष्ठेचा महत्त्वपूर्ण निकष आहे. मानवी हक्क आणि लोकशाही ह्या पायाभूत मूल्यांचे दैनंदिन जीवनात रक्षण करण्यास तत्पर असणारी संस्कृती निर्माण करणे हे या कार्याचे अंतिम उद्दिष्ट आहे. मानवी हक्कांचे ऐक्य आणि त्यांची वैश्विकता हा आजच्या जगातील कळीचा मुद्दा आहे. सहिष्णुता, आदर, अखंडता ह्यांना पूरक दृष्टीकोन विकसीत करणे हे आज मानव समाजापुढील सर्वात मोठे आव्हान आहे. ह्या दिशेने नेणारे लेव्हिन लिआ यांचे हे पुस्तक असून या पुस्तकाचा मराठी अनुवाद देशपांडे विकास यांनी केला आहे.

१.१२.७ चन्द्रा रमेश डॉ., "मानवाधिकार विविध आयाम एवं चुनौतियाँ", २०१०.

अंकित पब्लिकेशन्स दिल्लीद्वारा प्रकाशित पुस्तकामध्ये मानवी अधिकाराविषयी सविस्तर माहिती देण्यात आली आहे. मानवी समाजामध्ये अनेक स्तर आणि विभेद आहेत. भाषा, रंग, मानसिक भेद, जाती - प्रजातीय भेद इत्यादी अशा प्रकारच्या भेदभावामुळे समाजामध्ये विविधता पहायला मिळते. परंतु या विविधतेत एकतासुद्धा पहायला मिळते. ही एकता टिकविण्यासाठी मानवाधिकाराची भूमिका खुप महत्त्वाची आहे. मानवाधिकाराचा अर्थ मानवाचा सर्वांगिण विकास होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या हक्काची जाणीव करुन देणे आहे. मानवी अधिकार हे सर्वांसाठी सारखे आहेत. त्यामध्ये कोणत्याही स्वरुपाचा भेदभाव नाही. मानव अधिकाराच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा विकास करण्यासाठी मदत मिळते. मानवी अधिकार म्हणजे काय? त्याचा परिचय, मानवी अधिकार आणि भारतीय संविधान त्यामध्ये राज्याची भूमिका, राष्ट्रीय मानव अधिकार आयोग

आणि मानवी अधिकारांचे संरक्षण मानवाधिकार व मानवीय मूल्य, भारताच्या संदर्भात मानवाधिकाराचे कर्तव्य, सरकारी तसेच खाजगी संस्थामध्ये मानवाधिकाराचा उपयोग इत्यादी विषयी प्रस्तुत पुस्तकामध्ये सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

१.१२.८ सोलापूरे राजशेखर डॉ., "मानवी हक्क आणि समाज", २०१४.

अरुणा प्रकाशन लातूरद्वारा प्रकाशित या पुस्तकामध्ये विसाव्या शतकाने मानवी हक्काला वैश्विक स्वरुप आणि मान्यता प्राप्त करुन दिल्याबद्दल माहिती असून त्यात दोन महायुद्धाच्या झळांनी होरपळुन निघालेले जग मानवी हक्काच्या संरक्षणासाठी पुढाकार घेवू लागले. लोकशाही जीवन पद्धतीला अधिक दृढ करण्यासाठी मानवी हक्क हे अत्यावश्यक ठरतात. समाजातील प्रत्येक माणसाला माणूस या नात्याने हक्क प्राप्त झाले पाहिजेत तरच प्रत्येक व्यक्ती विकास करु शकतो, ही गोष्ट नाकारता येणार नाही याबाबत माहिती सांगितलेली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेला मानवी हक्काचा जाहीरनामा आणि भारतीय संविधानातील मूलभूत हक्क यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा प्रयास या पुस्तकात केला गेला आहे. महिला, ग्राहक, युवक, बालक, कामगार, आदिवासी, पोलिस, ज्येष्ठ यांच्या संदर्भाने मानवी हक्कांचा विचार सदरील पुस्तकामध्ये केला आहे. मानवी हक्काची वैश्विक संकल्पना, भारतीय संकल्पना तथा वैश्विक व भारतीय पातळीवर करण्यात आलेले त्यासाठीचे प्रयत्न यांचाही आढावा या पुस्तकातून घेतला गेला आहे. सदरील ग्रंथात मानवी हक्कांच्या महत्त्वपूर्ण पैलूंना विस्ताराने मांडून ते पैलू अधिक स्पष्ट करण्यात आले आहेत.

१.१२.९ गुप्त कैलाश नाथ, "मानवाधिकार और उनकी रक्षा", २००४.

अविराम प्रकाशन, दिल्लीद्वारा प्रकाशित या ग्रंथामध्ये मानवाधिकाराच्या बाबतीमध्ये अधिक माहिती देणारा व उपयोगी ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये मानवाधिकाराचे रक्षण कशा पद्धतीने करता येईल हे सांगितले आहे. बालअधिकार व मानवाधिकाराची माहिती, स्वातंत्र्य मिळाल्यापासुनचे पोलीस व नागरिकांचे बदलते स्वरुप, आतंकवाद व मानवाधिकाराची पायमल्ली, मानवाधिकाराच्या रक्षणासाठी पोलीसांची भूमिका, लोकप्रशासन चालवण्यामध्ये नागरिकांचा सहभाग, भ्रष्टाचार हा मानवाधिकाराला लागलेला कलंक, तुरुंगातील प्रशासनामध्ये मानवाधिकार आणि पोलिस, मानवाधिकारावर सतीप्रथेसारख्या कलंक, सर्वसामान्य नागरिकांच्या संरक्षणासाठी लोकांना मिळणारा न्याय एकविसाव्या शतकातील समस्या व त्या सुधारण्यासाठी करण्यात येणारे प्रयत्न, संपूर्ण विश्वामध्ये स्वीकारलेले

मानवाधिकार इ. विषयी सविस्तर लिखान केलेले आहे. मानवी अधिकारांमुळे सर्वसामान्य जनतेला कशा पद्धतीने न्याय मिळतो व तो न्याय मिळवण्यासाठी मानवाधिकाराचा उपयोग कसा करायचा असतो या विषयी प्रस्तुत ग्रंथामध्ये सविस्तर लिखान गुप्त कैलाश नाथ यांनी केलेले आहे.

१.१२.१० कुलकर्णी पी. के, "मानवी हक्क आणि सामाजिक न्याय", २०१३.

डायमंड प्रकाशन पुणे द्वारा प्रकाशित या ग्रंथातून मानवी हक्काचा इतिहास, संकल्पना आणि सिद्धांत समजून येतात. प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ आणि आधुनिक काळामध्ये मानवी हक्काचा शोध घेतला आहे. यात मानवी हक्काचे दोन दृष्टिकोन सांगितले आहेत. एक तत्त्वज्ञानशास्त्रीय किंवा सैद्धातिंक आणि दोन व्यावहारिक दृष्टिकोन होय. तत्त्वज्ञानशास्त्रीय आणि आधुनिकता या आधारावर दोन मानवी हक्काचे दृष्टिकोन आहेत. तत्त्वज्ञानशास्त्रीय दृष्टिकोनात धार्मिक, नैसर्गिक, प्रत्यक्षवादी, मार्क्सवादी आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा अंत:र्भाव होतो. तर आधुनिक दृष्टिकोनात उपयोगिता, न्याय, प्रतिष्ठा आणि समानता याचा सहभाग होतो. मानवी हक्काचे प्रकार, न्याय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर असलेला जाहिरनामा आणि ठरावाचा आढावा घेतला आहे. भारतीय राज्यघटनेत ज्या मानवी हक्काच्या तरतूदी आहेत त्यांचे स्पष्टीकरण दिले आहे. तसेच सामाजिक न्यायाच्या विविध पैलुंचे विश्लेषण केले आहे. मानवी हक्कासाठी झालेल्या चळवळीचा आढावा यात घेतलेला आहे. मानवासाठी आवश्यक असलेले हक्क व कर्तव्याची सविस्तर मांडणी प्रस्तुत ग्रंथामध्ये केलेली आहे.

१.१३ प्रकरणनिहाय रचना :-

१) प्रस्तावना

२) संशोधन पद्धती व साहित्य परीक्षण

३) संशोधन विषयाचे अर्थनिर्वचन

४) व्यष्टी अध्ययन, गृहितकृत्यांची पडताळणी व सैद्धांतिक दृष्टिकोन

५) संशोधन निष्कर्ष व उपाययोजना

१.१४ संदर्भग्रंथसूची :-

I] इंग्रजी संदर्भ :-

1. Bagga Amrita Dr. (1997), "A study of Women In Old Age Home of Pune" Kwality Book Publication, Culcutta, India.

2. Bhattacharyya, S.K., (1989), "The Problems of the Aged", Employment News, New Delhi.

3. Victor Christina R. (1994), "Old Age In Modern Society". Abhinav Publications, New Delhi, India.

4. Ray Arun, National Human Rights Commission of India.

5. Sureshkumar Soni, (2007), "Human Rights Concept, Issues and Emerging problems", legal Publication, New Delhi.

6. Human Rights In India from - Wikipedia.

7. Kothari C.R. (1998), "Research Methodology Methods and Techniques" Wiley Estem Ltd. New Delhi, India.

8. Thakur Devendra, (1997), "Research Methodology In Social Sciences", Deep Publication, New Delhi, India.

II] हिंदी संदर्भ

१. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (अनुवाद) : "राष्ट्रीय वृद्धजन नीती", भारत सरकार, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नई दिल्ली.

२. राय, अरुण, "भारत का राष्ट्रीय मानव अधिकार आयोग", राधा पब्लिकेशन नई दिल्ली, २००५.

३. न्यायमुर्ती पी.आर. कृष्णा अय्यर, "मानव अधिकार और कानून".

४. ललित चतुर्वेदी, "मानवाधिकार एवं कर्तव्य".

५.	गुप्ता चन्द्र सुभाष डॉ, शर्मा लता कांचन डॉ, "वृद्ध महिलाओं की उपेक्षा शोषण एवंसमस्याएँ", अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००९.

६.	शिशौदिया सुनील डॉ, "वृद्धावस्था के विविध आयाम", नीहारिका पब्लिकेशन, दिल्ली, २००९.

III] मराठी संदर्भ :-

१.	संत दि. म., "वृद्धाश्रम - काळाची गरज", ग्रंथाली ज्ञानयज्ञ प्रकाशन, ग्रॅंट रोड, मुंबई, २००४.

२.	गोळे नंदकुमार डॉ, "ज्येष्ठ नागरिक आजचे आणि उद्याचे", स्नेहल प्रकाशन ३६ ब, गुरुदत्त सहवास, ४९८, शनिवार पेठ, पुणे - ३०, २००९.

३.	सरोज भडभडे, "ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्पौषदे" उन्मेष प्रकाशन, विठ्ठलवाडी, सिंहगड रोड, पुणे - ३०, २००८.

४.	मुत्रगी पी. के., "वृद्धत्व : देशोदेशी" ग्रंथाली ज्ञानयज्ञ प्रकाशन, ग्रॅंट रोड, मुंबई, २००३.

५.	गंदेवार एस.एन., "भारतातील समाज : वादातील विषय आणि समस्या" विद्याभारती प्रकाशन, गीतांजली मार्केट, मेन रोड, लातूर, २००५.

६.	कत्तापल्ले लक्ष्मण, "भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य", विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

७.	कुलकर्णी स्वाती डॉ, "मानवी हक्कातील मूलभूत संकल्पना", य.च.मा.मुक्त विद्यापीठ, नाशिक.

८.	विकिपीडिया - "मानवाधिकाराचे वैश्विक घोषणापत्र"

९.	ताटके निलम डॉ, "संशोधन करताना", डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१५.

१०.	आगलावे प्रदीप डॉ, "सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे", विद्या प्रकाशन, नागपूर, २००३.

११.	घोटाळे रा. ना. प्रा., "समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पद्धती", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २०००.

१२.	पाटील बा. भा. प्रा., "संशोधन पद्धती", श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

Websites Visited :-

१. www.oldagetheory.com

२. www.elderageing.com

३. www.openculture.com

४. www.libgen.rus.ec.

५. www.gerontology.com.

६. www.concept of old Age.com

७. https//mrwikipedia.org

~: संशोधक :~

बोकडे भगवंत चंद्रकांत

एम.ए., बी.एड., सेट, एम.फिल.

~: मार्गदर्शक :~

डॉ.बी.आर.भोसले

सहयोगी प्राध्यापक, (समाजशास्त्र विभाग)

यशवंत महाविद्यालय, नांदेड.